राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत एकूण ४ शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ करून एकूण २० प्राथमिक पदांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः MSC-२१०२२/४/२०२५-MSC-SM-५**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: ११ मे, २०२६

**वाचा**

1. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांकः प्राशाव -२०२३/ प्र. क्र.९७/एसएम-५, दि.१५ मार्च, २०२४**
2. **शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे क्रमांकः प्राशिसं/टे-३०१/२०२४/४८७८, दि. १६, जुलै, २०२४ चे पत्र**
3. **शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे क्रमांकः प्राशिसं/टे-३०१/२०२५/७५७, दि. १४, फ़ेब्रुवारी, २०२५ चे पत्र**
4. **वित्त विभाग, उप समितीचे दि. ०६ फ़ेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त क्रमांकः पदनि- २०२६/प्र.क्र. ०६/ आपुक, दि. २४ फ़ेब्रुवारी, २०२६**

**प्रस्तावना**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि. १५.०३.२०२४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये जिल्हानिहाय मंजूर पायाभूत पदांच्या मर्यादेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग व आवश्यकता असल्यास उच्च प्राथमिक व माध्यमिक वर्ग जोडण्यास तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग व आवश्यक असल्यास माध्यमिकचे वर्ग जोडण्यास मान्यता प्रदान करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून अनुक्रमे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/आयुक्त, महानगरपालिका यांना घोषित करण्यात आले आहे. तसेच सदर वर्ग जोडताना कार्यरत शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार सदर शिक्षक वर्ग करत असताना प्राथमिक / माध्यमिक प्रवर्गातील शिक्षकांच्या वेतनास संरक्षण देऊन मंजूर पायाभूत रिक्त पदांच्या मर्यादेत सदर वर्ग जोडण्यास मान्यता देण्यात यावी. सदर वर्ग जोडताना प्राथमिक मधून माध्यमिक व माध्यमिक मधून प्राथमिक मध्ये पायाभूत पदे वर्ग करण्याची आवश्यकता असल्यास अशा पदांना वेतन अदा करण्यामधील वित्तीय बाबींकरीता सविस्तर प्रस्ताव विहित पद्धतीने शासनास सादर करावा अश्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांच्याकडून संदर्भ क्र. २ व ३ अन्वये प्राप्त झालेल्या

जिल्हा परिषद कोल्हापूर संचालित १) परशुराम विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज,गगनबावडा ( इ. ११ वी व १२ वी कला शाखा) २) महाराणी राधाबाई हायस्कूल व ज्यु. कॉलेज, गडहिंग्लज ( इ.११ वी व १२ वी विज्ञान शाखा) ३) राजश्री शाहू छत्रपती विद्यानिकेतन, शिंगणापूर,ता. करवीर (इ.११ वी व १२ वी कला व वाणिज्य शाखा) व ४) उर्दू विद्या मंदिर, नेसरी, ता. चंदगड ( इ. ९ ते १२ वी दर्जावाढ) करीता एकूण २० पदांच्या श्रेणीवर्धानाचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. शासन निर्णय दि. १५.०३.२०२४ सोबतच्या परिशिष्ट अ नुसार जिल्हा परिषद कोल्हापूर येथील एकूण मंजूर पायाभूत पदे ९७८१ यापैकी सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार ७६३२ पदे मंजूर करण्यात आली आहे. सबब उर्वरित २१४९ प्राथमिक पदांपैकी २० पदांचे श्रेणीवर्धन करणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावास संदर्भ क्र. ४ अन्वये वित्त विभागाच्या उप समितीच्या दि. ०६ फ़ेब्रुवारी, २०२६रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली असून सदर ४ शाळांच्या दर्जावाढीस व त्यानुषंगाने प्राथमिक मधील २० पदांचे श्रेणीवर्धन माध्यमिक व उच्च माध्यमिक मधील पदांमध्ये करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

जिल्हा परिषद, कोल्हापूर संचालित पुढील तक्यातील नमूद शाळांच्या दर्जावाढीस व त्यानुषंगाने मंजूर पायाभूत पदाच्या मर्यादेतील प्राथमिक मधील २० पदांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक मधील २० पदांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | सद्यस्थितीत कार्यरत वर्ग | मंजूर दर्जावाढ | श्रेणीवर्धन करण्यात आलेली पदे |
|---|---|---|---|---|
| १. | महाराणी राधाबाई हायस्कूल व ज्यु. कॉलेज, गडहिंग्लज | इ.११वी व १२ वी विज्ञान शाखा | इ.११वी व १२ वी विज्ञान शाखा | ६ पदे (उच्च माध्यमिक) |
| २. | परशुराम विद्यामंदिर व ज्यु. कॉलेज, गगनबावडा | इ.११वी व १२ वी कला शाखा | इ.११वी व १२ वी कला शाखा | ४ पदे (उच्च माध्यमिक) |
| ३. | राजश्री शाहू छत्रपती विद्यानिकेतन, शिंगणापूर,ता. करवीर | इ.१०वी | इ.११ वी व १२ वी कला व वाणिज्य शाखा | ६ पदे (उच्च माध्यमिक) |
| ४. | उर्दू विद्या मंदिर, नेसरी, ता. गडहिंग्लज | इ.१ ते ८ वी | इ. ९ वी ते १२ वी कला | ४ पदे (२ पदे माध्यमिक व २ पदे उच्च माध्यमिक) |
| **एकूण पदे** | | | | **२०** |

सदर श्रेणीवर्धनानंतर जिल्हा परिषद कोल्हापूर येथील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेमधील मंजूर असलेली ७६३२ पदे वजा जाता पायाभूत पदांची संख्या ही २१४९ पदे असून त्यापैकी २१४९ मधील २० पदांना माध्यमिक व उच्च माध्यमिक च्या श्रेणीवर्धनाकरीता मान्यता दिल्याने २१२९ पायाभूत पदे शिल्लक राहतात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१११३०१३०६७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAMOD VITHOBA KADAM

Digitally signed by PRAMOD VITHOBA KADAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=f82b9e0b005ed06987e1ae26683203c8f241022e0aad6b1c827af561b72f83bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF4901BED6A4BEE0ED963C63F1B0172A4718894A400C0988FBB3381DB913696F, cn=PRAMOD VITHOBA KADAM
Date: 2026.05.11 13:02:30 +05'30'

**( प्रमोद कदम )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव ( शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय ,मुंबई
३. आयुक्त ( शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , कोल्हापूर
५. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक) , महाराष्ट्र राज्य , पुणे
६. शिक्षण संचालक (प्राथमिक) , महाराष्ट्र राज्य , पुणे
७. विभागीय शिक्षण उपसंचालक ,कोल्हापूर
८. शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/ माध्यमिक), कोल्हापूर
९. निवडनस्ती ( एसएम-५)